सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे
२५, जुने सर्किट हाऊस जवळ, राणीचा बाग,
पुणे – ४११००१

दूरध्वनी : २०२-२६३६२०७१

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

---

क्र.आसंप्रसं/स्पर्धा परीक्षा/२०२४-२५/का.०४/३८९४ दिनांक :- १७.१०.२०२४

# मुदतवाढ जाहीर सूचना

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे संस्थेमार्फत अनुसूचित जमाती या संवर्गातील पात्र लाभार्थी यांच्यासाठी पोलीस/सैन्य या पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी दि. १४.१०.२०२४ रोजी जाहीर सुचना देण्यात आली होती. यामध्ये दिनांक १७.१०.२०२४ रोजी रात्री. ११.५९ वाजेपर्यंत मुदत वाढविण्यात आली होती.

त्यानुसार सदर सुचनेद्वारे जाहीर करण्यात येते की, अनुसूचित जमाती या संवर्गातील पात्र लाभार्थी यांच्यासाठी पोलीस/सैन्य या पदांच्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेसाठी ज्या उमेदवारांचे उंचीमुळे उपरोक्त कालावधीत अर्ज सादर झालेले नाहीत अशा उमेदवारांसाठी तसेच ज्या उमेदवारांना उपरोक्त कालावधीत अर्ज सादर करता आलेला नाही अशा सर्व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी दिनांक **१७.१०.२०२४ रात्री. १२.०० वा. पासून ते दिनांक २०.१०.२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत** सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी लाभार्थ्यांचा सहभाग विचारात घेता ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत वाढविण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज सादर करताना काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास ईमेल पत्ता – cevt.policemilitary@gmail.com, मोबाईल क्र. 08956894140, दूरध्वनी क्र. 020-26330854 यावर कार्यालयीन वेळेतच संपर्क साधावा. या अनुषंगाने इच्छुक लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विशेष टीप : दिनांक ०८.०८.२०२४ ते दिनांक ३१.०८.२०२४ आणि १४.१०.२०२४ ते १७.१०.२०२४ या कालावधीत ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत त्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. मात्र उपरोक्त अधिनियमात उंचीबाबत नमूद केलेले निकष हे उमेदवाराने निवडलेल्या संस्थेमध्ये प्रवेशाच्या वेळेस कागदपत्रे तपासणी तसेच शारीरिक चाचणी दरम्यान लागू केले जातील.

(चंचल पाटील)
सहसंचालक